**प्रेस नोट दि.१९/११/२०१७**

मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांचे अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिक कक्ष,गुन्हे शाखा, पुणे शहर पोलीस व श्री.विनोद शहा, चेअरमन- जनसेवा फौंडेशन, पुणे रिजनल रिसोर्स ॲण्ड ट्रेनिंग सेंटर(आर आर टी सी) ॲण्ड (एन आय एस डी) मिनीस्टरी ऑफ सोशल जस्टीस ॲण्ड एम्पॉवरमेंन्ट यांचे सयुक्त विद्यमाने सदर कार्यशाळा भारतामध्ये पहिल्यांदाच आयोजीत करण्याचा मान पुणे शहर पोलीस यांना मिळालेला आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी पोलीस स्टेशन स्तरावर नेमण्यात आलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे करीता दि.१७/११/२०१७ रोजी १ दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेस एकुण ८५ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी ज्येष्ठ नागरिकांचे छळवणुकीचे स्वरुप- ज्येष्ठ नागरिकांचे नावावरील स्वकमाईची जंगम मालमत्ता स्वतःचे नावावर करुन घेणे, आई-वडीलांना घराबाहेर काढणे, एकत्र राहत असतील तर जेवण्यास वेळेवर न देणे, औषधपाणी न करणे इत्यादी तक्रारी असतात. त्याकडे आत्मीयतेने लक्ष देवुन पोलीसांनी ज्येष्ठ नागरिकांचे नातेवाईकांना आवश्यक ते समुपदेशन करावे. पुणे पोलीसांनी ज्येष्ठ नागरिकांना वाढदिवसाची आठवण ठेवुन त्याचे स्मरण द्यावे जेणे करुन त्यांना जगण्याची ऊर्जा मिळेल. सदरची कार्यवाही प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर होणे गरजेचे आहे. ज्येष्ठ नागरिक तक्रारी घेवुन आल्यास त्यांना सन्मानाने वागणुक देवुन उत्तम श्रोता होवुन सर्व म्हणणे ऐकुण घेवुन त्यांना योग्य न्याय देणे गरजेचे आहे. तसेच आपण ज्यांचे पोटी जन्म घेतला आहे त्यांचे कडे दुर्लक्ष केल्याने आपली प्रगती होवु शकेल काय ? ज्येष्ठांचा आर्शीवाद लाभणे हा भारतीय संस्कृतीचा वारसा आहे. या संस्कृतीची जपणुक करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकांचे कर्तव्य आहे. इत्यादी मार्गदर्शन केले.

तसेच सदर कार्यशाळेमध्ये १) श्री. भालचंद्र मुळे, उपसंचालक सामाजीक न्याय विभाग, पुणे यांनी आई वडीलांचा व वरिष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ कायदेविषयक २) डॉ.धनंजय चव्हाण, मानसोपचार तज्ञ यांनी ज्येष्ठांचे मानसिक आरोग्य व उपाययोजना (विस्मरण) सविस्तर ३) डॉ.आरती पेंडसे समुपदेशक यांनी ज्येष्ठांची छळवणुक, कौटुंबिक हेळसांड व दुर्लक्ष ४) ब्रम्हकुमारी सरिता राठी यांनी ज्येष्ठ नागरिकांची सुरीक्षतता एकाकीपण कसे घालवावे या विषयी सर्व व्याख्यात्यांनी सविस्तर माहिती दिली.

सदर कार्यशाळेस श्री.प्रदीप देशपांडे-अपर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा, श्री.पंकज डहाणे-पोलीस उप-आयुक्त,गुन्हे शाखा, पोलीस निरीक्षक श्री.संजय निकम, स्वाती थोरात व ज्येष्ठ नागरिक कक्षाकडील कर्मचारी सदर कार्यशाळेस उपस्थित होते.

पोलीस उप-आयुक्त
गुन्हे शाखा,पुणे शहर


JANASEVA FOUNDATION
Janaseva Foundation, Pune
Regional Resource & Training Center (RRTC)
And
(NISD) Ministry of Social Justice & Empowerment
One Day Awareness Programme
For Police Functionaries
of Pune Police
Date : 17th November 2017 ■ Venue : Police Commissioner's Office, Pune - 01


Janaseva Foundation, Pune
Regional Resource & Training Center (RRTC)
And
(NISD) Ministry of Social Justice & Empowerment
One Day Awareness Programme
For Police Functionaries
of Pune Police
No Signal
No Signal

